

*'ओम्‌काराचा साक्षात्कार' या ग्रंथाचे प्रकाशन कवी ह. ना. जोशी तथा सुधांशु करीत असून छायाचित्रात डावीकडून लेखक रघुनाथ पाटील, व्ही. टी. पाटील, बाळासाहेब वग्यानी, रंगराव पाटील दिसत आहेत.*

छाया : जॉनी ट्रेनर.

पुढारी 24/7/89

# 'ओम्‌काराचा साक्षात्कार' वाचकांच्या मनावर विराजमान होईल

## सुधांशुंचे उद्‌गार

कोल्हापूर, दि.२३ [प्रतिनिधी] : देवापेक्षा देहाला महत्व असलेल्या आणि गुरू शिष्याच्या संवादातून वाचकांच्या जवळ गाण्याची किमया लेखकाने साधली असल्याने ओम्‌काराचा साक्षात्कार हा ग्रंथ वाचकांच्या मनावर विराजमान होईल. असे उद्‌गार पद्मश्री ह. न. जोशी तथा सुधांशु यांनी ह्या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभावेळी काढले.

ताराराणी विद्यापीठाच्या शारदा हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी व्ही. टी. तथा काका पाटील होते. ग्रंथाचे लेखक रघुनाथ पाटील तसेच ग्रंथाचे मुद्रक गोविंदराव चौगुले यांचा व्ही. टी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ग्रंथामध्ये गुरु परंपरेबरोबरच मनुष्य उत्पत्तीपासून देहाचे ज्ञान तसेच नैतिकता, अहिंसा, सत्य-असत्य, स्वर्ग-नरक, दशावतारी आदींची चर्चा करण्यात आली आहे. अध्यक्षीय भाषणात व्ही. टी. पाटील यांनी बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी शिक्षणसंस्था काढल्याचे सांगितले. यावेळी बाळासाहेब वग्याणी यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक रा. स. अंबपकर यांनी केले. तर प्रा. जे. बी.शिंदे यांनी आभार मानले.कार्यक्रमास शिगाव, आष्टा भागातील नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.